आरा गिरणी परवाने देण्याबाबत
पर्यावरणाची संरक्षणार्थ उपाय योजना

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक एसडब्ल्युएम १०८०/१११९०४ फ-१
मंत्रालय मुंबई ३२
दिनांक १० सप्टेंबर १९८२.

परिपत्रक

महाराष्ट्र राज्यातील शासकीय वनात चोरट्या तोडीचे प्रकार फार मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे आरा गिरणींच्या व्यवहारावर कडक नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासन परिपत्रक क्रमांक एसडब्ल्युएम/१०८०/१११९०४-फ-१, दिनांक ७-४-१९८१ अन्वये, असे निर्देश देण्यात आले होते कि महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, सहकारी बँका, संघ, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ इत्यादी संस्थांच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली येणाऱ्या सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अशा सूचना द्याव्यात कि त्यांनी आरा गिरणींच्या संदर्भात औद्योगिक परवाना, कर्ज, वीजपुरवठा इत्यादीसाठी, आलेल्या अर्जांवर, त्या संबंधित वन विभागाने प्रदान केलेल्या आरा गिरणी परवान्याची प्रमाणित प्रत असल्याशिवाय विचार करू नये.

वनसंरक्षणाबद्दलची स्थिती अजूनही चिंता करण्याजोगी असल्यामुळे शासनाने प्रचलित धोरण बदलून आरा गिरणी मालकांना परवाना देण्यापासून परावृत्त करण्याचे ठरविले आहे. या धोरणानुसार, आरा गिरणी परवाना मिळण्यापूर्वी मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची पूर्व मान्यता घेणे आवश्यक असते. त्यामुळे, शासनाने विविध विभाग, संबंधित एजन्सीज आणि संघटना यांना पुन्हा एकदा विनंती करण्यात येते कि, त्यांनी नवीन आरा गिरणीच्या संबंधित नाहरकत प्रमाणपत्र, कर्ज, औद्योगिक परवाना, वीजपुरवठा इत्यादीसाठी आलेल्या कोणत्याही अर्जांवर, मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची पूर्वानुमति असल्याशिवाय विचार करू नये.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ग्रामविकास विभाग, नगरविकास व आरोग्य विभाग या संबंधित विभागांना विनंती करण्यात येते कि त्यांनी त्यांच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली असलेल्या संबंधित स्थानिक संस्था ( महानगरपालिका/परिषद आणि ग्रामपंचायत ) यांना या संबंधात सुस्पष्ट सूचना द्याव्यात व त्यांच्या प्रती महसूल व वन विभागास माहितीसाठी पाठवाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही /-
( ऑल. डेव्ह. रेगो )
उप सचिव,
महसूल व वन विभाग

प्रत/